


Subscribe **इयत्ता – चौथी (16 जुलै) माझा अभ्यास** Subscribe

# शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

**शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट**

## दिवस सोळा :






गतवर्षीच्या क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट.

पाठ वाचा व समजून घ्या.

टेस्ट सोडवा

उजळणी कर.

# ३. आम्हांलाही हवाय मोबाइल !



माझं एकदा ऐक ना आई. मी आता मोठी झाले, असं तूच नाही का म्हणालीस? मग मलाही सगळ्यांसारखा एक छान मोबाइल फोन पाहिजे की नाही? कशासाठी म्हणजे काय ? बोलण्यासाठीच ना असतो फोन? वा...! गम्मतच आहे. ताईने मागितला, की लगेच मिळतो फोन. दादा तर कॉलेजलासुद्धा नेतो त्याचा मोबाइल. बाबांकडे दोन–दोन मोबाइल असतात अन् आम्ही मागितला तर म्हणे गरज काय त्याची ?

ए... तायडे, उगीचच काहीही बोलू नकोस हं. तुला मोबाइल मिळाला, तेव्हा मी काही बोलले होते का ? हो, हो. आम्हांलाही महत्त्वाची कामं असतात, महत्त्वाचं बोलायचं असतं. दादाचा फोन घेते मी कधीकधी, पण फक्त गेम्स खेळण्यासाठीच गं. बोलण्यासाठी काय करावं मग?

आई, पुढल्या महिन्यात माझा वाढदिवस येतोय. मित्रमैत्रिणींना पार्टीसाठी बोलवायला किती मजा येईल ! 'अरे ! उद्या संध्याकाळी माझी बर्थडे पार्टी घरीच आहे गच्चीवर. तू जरा लवकर येशील ना ? गुड. अगं, खूप धमाल करू ! हो, सगळ्यांना आता फोनवरच सांगतेय. बाय.'

वाव ! किती मस्त वाटेल असे फोन करताना. आई, अगं शाळेत अचानक सुट्टी घ्यावी लागली, तर उगीच बोलणी ऐकावी लागतात सरांची. त्यापेक्षा पपा कसे घरातूनच ऑफिसला फोन करतात, तसा सरांना शाळेत फोन करायचा. 'हॅलो... गुड मॉर्निंग सर, मला आजची सुट्टी मिळेल का ? जरा महत्त्वाचं काम आहे घरी. हो सर, उद्या नक्की येणार शाळेत. थँक्यू सर.'

खूप कामं करता येतात अशी. तू सांग ना बाबांना. ताईच्या वेळी नाही का तूच सांगितलंस बाबांना. ताई तुझी लाडकी आणि मी काय दोडकी आहे का गं ? आता तुझ्याकडे नसला म्हणून काय मलाही नको का मोबाइल? अगं, माझा मोबाइल आला, की तो आपण दोघीमिळून वापरू. नक्की. आजी... तू नको आईला रागावूस. काय म्हणतेस? तुम्हा मुलांना मोबाइलवर किती वेळ बोलावं याचं भानच नसतं. अगं, मोबाइल फोनमुळे कोणालाही संपर्क करता येतो. दादा तर सारखं मित्रांना सांगतो, 'अरे, मी ग्रंथालयात अभ्यास करतोय.' तू म्हणतेस ते खरं, पण मोठी माणसं करतात असं. आम्ही मुलं नाही करणार. देऊन तर बघा आधी मोबाइल आमच्या हातात. पपांना तर सांग. बघू काय होतंय ते !

– सूर्यकांत सराफ

## खालील संख्या सूचनेनुसार लिहा.

### २. संख्याज्ञान

टेस्ट सोडवा

### पाच अंकी संख्यांचे वाचन व लेखन

◆ खालील पाच अंकी संख्या पाहा.

| दह | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|
| १ | ३ | ५ | ७ | ८ |

या संख्येचे वाचन एक दशहजार, तीन हजार, पाचशे अठ्ठ्याहत्तर असेही करता येईल; परंतु सोईसाठी ही संख्या 'तेरा हजार पाचशे अठ्ठ्याहत्तर' अशी वाचतात; म्हणजेच वाचताना दह आणि ह ही स्थाने एकत्र घेतात.


◆ पुढील संख्या वाचा व अक्षरांत लिहा.

२०,००० = वीस हजार     ६८,००० = .............     ७९,००० = .............

८०,००० = .............     ५४,००० = .............     ९९,००० = .............


◆ प्रतीके पाहा. तयार झालेल्या संख्या वाचा.

(१)





४२,१२१ = बेचाळीस हजार एकशे एकवीस

(२)





५०,००१ = पन्नास हजार एक

(३)




६०,०२६ = .............

(४)




३१,००० = .............

### अक्षरी संख्येचे अंकांत लेखन

(१) बासष्ट हजार सदतीस : ६२,०३७

६२ ह = ६० ह + २ ह म्हणजेच यात ६ दह व २ ह आहेत. या संख्येत शतक नाहीत, म्हणून शतकाच्या घरात शून्य लिहिले.

(२) सत्तर हजार दोनशे सहा : ७०,२०६

७० हजार म्हणजे ७ दह आहेत. याशिवाय संख्येत आणखी हजार नाहीत व दशकही नाहीत, म्हणून हजार व दशक या घरांत ० लिहिले.

(३) तीस हजार एक : ३०,००१

इथे ३० हजार म्हणजे ३ दह आहेत. याशिवाय संख्येत आणखी हजार, शतक किंवा दशकही नाहीत, म्हणून त्या घरांत ० लिहिले.

Write the following numbers as instructed.

## 2. Number Work

टेस्ट सोडवा

### Reading and writing five-digit numbers

- **Look at the five-digit number below.**

| TTh | Th | H | T | U |
|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 5 | 7 | 8 |


This number can be read as one ten thousand, three thousand, five hundred and seventy-eight.
But to make it easier we read it as thirteen thousand, five hundred and seventy-eight.

That is, we read the digits in the ten thousands and thousands places together.


- **Read the following numbers and write them in words.**

20,000 = Twenty thousand    68,000 = ............    79,000 = ............
80,000 = ............    54,000 = ............    99,000 = ............


- **Look at the symbols and read the number they make.**

(1)




42,121 = Forty-two thousand, one hundred and twenty-one

(2)



50,001 = Fifty thousand and one

(3)



60,026 = ............

(4)



31,000 = ............

### Numbers in words and figures

1. **Sixty-two thousand thirty seven : 62,037**
   62Th = 60 Th + 2 Th. It means that here we have 6 ten thousands and two thousands. This number has no hundreds. So we write 0 in the hundreds place.
2. **Seventy thousand two hundred and six : 70,206**
   70 thousand is 7 ten thousands. There are no more thousands in this number. There are no tens, either. So we write 0 in the thousands and tens places.
3. **Thirty thousand and one : 30,001**
   Here, 30 thousand is 3 ten thousands. Besides these, there are no thousands or hundreds or tens in this number. So we write 0 in all those places.

टेस्ट सोडवा

## Listen and understand. Revision

**2. Listen and read aloud.**

* Oh, what shall I do ?
* What shall I take ?
* What shall I say ?

प्रत्येक वाक्य वेगवेगळे हावभाव करून सादर करण्याची संधी मुलांना द्यावी. इतर छोटी, सोपी वाक्ये वापरूनही असा सराव घ्यावा. सादरीकरण अर्थपूर्ण वाटेल, अशीच वाक्ये निवडावी.

• **Present each sentence to show all these emotions.**

happy angry sad afraid




**3. Read aloud and remember. Copy the sentences in your notebook.**

* I will eat all vegetables.
* I will not waste water.
* I will help my friends.
* I will take care of my things.

**4. Look at the pictures. Read the words and write 'one' or 'many'.**

.......... cat




.......... cats

........ mouse



......... mice

.......... flower



.......... flowers

.......... leaf



.......... leaves


उतारा वाचा व समजून घ्या.

## २. सजीवांचे परस्परांशी नाते

टेस्ट सोडवा



माणसावर जसा तिन्ही ऋतूंचा परिणाम होतो, तसा तो इतर सजीवांवरही होतो. सजीवसृष्टीत ऋतुमानाप्रमाणे होणारे बदल दरवर्षी आपल्याला दिसतात.



हिवाळ्याचे वर्णन पानगळीचा ऋतू असेही करतात कारण हिवाळ्यात अनेक झाडांची पाने गळून पडतात.

ज्या प्राण्यांच्या अंगावर केस असतात, त्यांपैकी अनेक प्राण्यांच्या अंगावरचे केस दाट होतात. त्यामुळे त्यांचे थंडीपासून आपोआप रक्षण होते. मेंढ्या, काही प्रकारच्या शेळ्या आणि काही प्रकारचे ससे यांच्यामध्ये तर ही वाढ डोळ्यांत भरेल इतकी असते. हिवाळा सुरू असतानाच आंब्याला फुलोरा येऊ लागतो. त्याला आंब्याचा मोहर म्हणतात.

- **नवा शब्द शिका**

**पालवी** – झाडांना येणारी नवीन कोवळी पाने. ती तांबूस रंगाची असतात. ती वाढून मोठी होत असताना त्यांचा रंग बदलून ती हिरवी होतात.



आंब्याचा मोहर

फेब्रुवारी महिना संपत आला, की थंडीचा कडाका कमी होऊ लागतो. मार्च महिना सुरू झाला की उष्णता जाणवू लागते. हिवाळा संपून उन्हाळा सुरू होतो. याच सुमाराला अनेक झाडांना पालवी फुटते. रानावनांत सगळीकडे तांबूस रंगाची नाजूक, कोवळी पाने दिसू लागतात. कोकीळ पक्ष्याचा मंजुळ आवाजही काही ठिकाणी ऐकू येतो.



उन्हाळ्यात बाजारामध्ये आंबे आणि कलिंगडे भरपूर येतात. या फळांचा तो हंगामच असतो. आंब्याची झाडे महाराष्ट्रात सगळीकडे असली, तरी कोकण आंब्यासाठी नावाजले जाते. उन्हाळ्यामध्ये कोकणात आंब्याच्या जोडीने काजूचाही हंगाम असतो. डोंगरउतारावर सगळीकडे काजूच्या झुडपांना लाल-पिवळी बोंडे लागलेली असतात.

वाचा व समजून घ्या.

## ३. मराठा सरदार – भोसल्यांचे कर्तबगार घराणे

टेस्ट सोडवा

**धामधुमीचा काळ :** संतांनी लोकांच्या मनांत भक्तिभाव निर्माण केला, तर शूर मराठा सरदारांनी महाराष्ट्रात शौर्याची परंपरा निर्माण केली.

तो काळच मोठा धामधुमीचा होता. विजापूरचा आदिलशाहा आणि अहमदनगरचा निजामशाहा या सुलतानांमध्ये महाराष्ट्रात नेहमी लढाया होत. लढाईसाठी त्यांना फौज लागे. या कामी ते मराठा सरदारांचा उपयोग करून घेत.

**शूर मराठा सरदार :** मराठे काटक व शूर होते. तसेच ते धाडसी होते, स्वामिनिष्ठ होते. लढाईवर मोठमोठे पराक्रम गाजवण्यात त्यांना मोठा अभिमान वाटे. हातात भाला, कमरेला तलवार असे हे धाडसी मराठा जवान घोड्यावर मांड घालून सरदारांच्या फौजेत दाखल होत. मराठे सरदार फौजबंद असत. कोणताही फौजबंद मराठा सरदार सुलतानाकडे गेला, की सुलतान त्याला आपल्या चाकरीस ठेवी. त्याला सरदारकी देई. कधीकधी जहागीरही देई. जहागीर मिळालेले सरदार स्वत:ला आपल्या जहागिरीचे राजे समजत.

विजापूर व अहमदनगर येथील सुलतानांच्या पदरी अनेक मोठमोठे मराठे सरदार होते. त्यांत सिंदखेडचे जाधव, फलटणचे निंबाळकर, मुधोळचे घोरपडे, जावळीचे मोरे, वेरूळचे भोसले हे प्रमुख होते. सिंदखेडचे जाधव हे देवगिरीच्या यादवांचे वंशज. शिवरायांच्या मातोश्री जिजाबाई या सिंदखेडच्या लखुजी जाधवांच्या कन्या होत.

**शौर्याची परंपरा :** हे सारे सरदार शूर वीर होते, पण त्यांच्यापैकी अनेकांचे आपापसात हाडवैर असे. स्वकीयांसाठी एक होऊन काहीतरी करावे अशी दृष्टी त्यांना नव्हती. त्यामुळे त्यांचे शौर्य त्या वेळी परक्यांच्या उपयोगी पडत असे; पण असे असले तरी, महाराष्ट्रातील हजारो तरुणांना त्यांनी पराक्रमाची गोडी लावली. त्यांनी अनेक पराक्रमी वीर निर्माण केले. मराठे सरदारांनी महाराष्ट्रात शौर्य जिवंत ठेवले. महाराष्ट्रातील शूर घराण्यांपैकी वेरूळचे भोसले घराणे मोठे पराक्रमी निघाले.

**घृष्णेश्वराचे मंदिर :** सुमारे चारशे वर्षांपूर्वीची गोष्ट. वेरूळच्या लेण्यांजवळील घृष्णेश्वराचे सुंदर मंदिर मोडकळीस आले होते. त्याच्या भिंतींना भेगा पडल्या होत्या. मंदिरातील पुजारीही मंदिर सोडून निघून गेला होता. एवढे महान दैवत ! पण कोण अवकळा आली होती त्या मंदिरावर. त्या मंदिराकडे पाहून भक्तांना हळहळ वाटे. येणारे-जाणारेही हळहळत, उसासे सोडत, पण त्याच्या दुरुस्तीचा विचार कोण करतो ?

त्या पडक्या मंदिरात एक शिवभक्त नित्य नियमाने येत असे. शिवाच्या पिंडीवर बेलफूल वाहत असे. हात जोडून आपल्या मनातले श्रीशिवाला सांगत असे. एक दिवस त्याने गडीमाणसे आणली. मंदिराच्या पडक्या भिंती नीट केल्या. मंदिराची सारी व्यवस्था लावली. घृष्णेश्वराचा जीर्णोद्धार केला. मंदिराच्या आतबाहेर दिवे लावले. घृष्णेश्वराचे गेलेले वैभव

# माझा ऑनलाईन अभ्यास

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे    वेब स्त्रोत-‘ई-बालभारती’    सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in